**<u>ठळक बातम्या</u>**

- २०३० पर्यंत व्यापार ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्यावर भारत आणि कॅनडा यांच्यात सहमती

- अमेरिकेसोबत चर्चा करायला इराणचा नकार, अमेरिका आणि इस्रायलकडून हल्ले तीव्र

- पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांना सावधगिरी बाळगण्याचं केंद्राचं आवाहन

- राज्यभरात सर्वत्र होळी आणि शिमग्याचा उत्साह

**आणि**

- माजी कुलगुरू, साहित्यिक डॉ. जनार्दन वाघमारे यांचं निधन

**<><><><><>**

भारत आणि कॅनडा यांच्यातला व्यापार २०३० पर्यंत ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे. दोन्ही देशांमधला सर्वंकष व्यापार करार पूर्ण करण्यावरही सहमती झाल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्यासोबत नवी दिल्लीत चर्चा केल्यावर ते वार्ताहरांना संबोधित करत होते. दोन्ही देशातल्या व्यापार करारामुळं दोन्ही देशांमध्ये गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी वाढतील असं प्रधानमंत्री म्हणाले.

**- - होल्ड - प्रधानमंत्री - - -**

भारत आणि कॅनडा संरक्षण संवाद स्थापन करण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. तसंच यावर्षी संयुक्तपणे नवीकरणीय ऊर्जा परिषद आयोजित केली जाणार आहे. दोन्ही देशांमधल्या विविध विद्यापीठांमध्येही याप्रसंगी विविध करार झाले.

**<><><><><>**

अमेरिकेसोबत वाटाघाटी करायला इराणने स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चर्चेची तयारी दाखवली होती. एका माध्यमसंस्थेच्या वाटाघाटीची

शक्यता वर्तवणाऱ्या वृत्ताला उत्तर म्हणून लष्करी अधिकारी अली लारिजानी यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करत वाटाघाटीच्या शक्यता फेटाळून लावल्या.

अयातुल्लाह खामेनी यांच्या हत्येचा इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अरागची यांनी निषेध केला आहे. अमेरिका आणि इस्त्रालयचा हल्ला बेकायदेशीर असून इराण स्वसंरक्षणासाठी प्रत्युत्तर देत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. आतापर्यंत या युद्धात दोनशे जणांचा मृत्यू झाला आहे.

अमेरिका आणि इस्त्रायलनंही इराणवरचे हल्ले अधिक तीव्र केले. यात इराणच्या अनेक युद्धनौका तसंच बॅलिस्टिक क्षेपणास्त्र तळ नष्ट झाले. इराणमधल्या अनेक इमारती, तसंच इस्लामिक रिव्हॉलिशनरी गार्ड कॉर्प्सचं मुख्यालय उद्ध्वस्त झालं आहे.

ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनी या युरोपियन देशांनी अमेरिका आणि इस्त्रायलला मदतीचा हात पुढे केला आहे. तर आखाती देशांनीही इराणला प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला आहे. आज अनेक अमेरिकन युद्ध विमानं पाडण्यात आल्याचं कुवेतनं म्हटलं आहे. इराणनं आखाती देशातल्या विमानतळ, बंदरं आणि निवासी क्षेत्रांना लक्ष्य केलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं सर्व राज्यांना पत्र पाठवून सावधगिरी बाळगण्याचं आवाहन केलं आहे. इराणच्या बाजूनं बोलणाऱ्या कट्टरपंथी लोकांची ओळख पटवायला केंद्रीय गृहमंत्रालयानं सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर कारवाईची गरज यात व्यक्त केली आहे.

<><><><><>

मध्य आशियात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जालना मतदारसंघाचे काँग्रेसचे खासदार कल्याण काळे दुबईमधे अडकून पडले आहेत. ते त्यांच्या काही मित्रांसह पर्यटनासाठी दुबईला गेले होते. सर्वजण सुरक्षित असून कुटुंबाच्या संपर्कात आहेत, असं प्रशासनानं कळवलं आहे.

मक्का आणि मदिना इथं गेलेले नाशिक शहर आणि मालेगावमधले १३२ नागरीक तिथं अडकले आहेत. तसंच नाशिक जिल्ह्यातले काही व्यावसायिक आणि पर्यटक दुबई इथं

अडकले आहेत. सर्व जण सुखरूप असल्याची माहिती त्यांनी त्यांच्या कुटुंबियांना कळवली आहे.

या युद्धामुळे मुंबईतल्या जेएनपीटी बंदरावर नाशिकहून निघालेले कांद्याचे २००, तर द्राक्षांचे ३५ कंटेनर अडकून पडले आहेत.

**<><><><><>**

आज फाल्गुन पौर्णिमा म्हणजे होळी पौर्णिमा राज्यासह देशभरात साजरी होत आहे. होळी आणि धुलिवंदनानिमित्त सर्वत्र उत्साहाचं वातावरण आहे. याविषयी अधिक माहिती ऐकुया आमच्या प्रतिनिधीकडून…

**- - कॅप्सूल - -**

*(अहिल्यानगर जिल्ह्यात शिर्डीच्या साईबाबा संस्थानातही होळीचा सण साजरा करण्यात आला. संस्थानाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सपत्नीक होळीची पूजा केली आणि होलिकादहन करण्यात आलं. यवतमाळ जिल्ह्यात होळी निमित्त लहान मुलं शिमग्याचा पारंपरिक घनमाकड हा खेळ खेळण्यात दंग झाली आहेत. धुळे जिल्ह्यात निमगुळ इथे महिलांनी होळीनिमित्त परिसराची स्वच्छता करून दुर्गुणाची होळी साजरी केली. होळी आणि धुळवडीवेळी मादक पदार्थांचं सेवन न करता सर्वांनी समाजाच्या प्रगतीसाठी काम करण्याचं आवाहन यावेळी करण्यात आलं.*

*रत्नागिरी जिल्ह्यात यंदा तेराशे सार्वजनिक आणि अडीच हजार खासगी होळ्यांचं आयोजन करण्यात आलं आहे. आज होळी पेटवल्यानंतर ग्रामदैवतांचा शिमगोत्सव सुरू होईल. पालख्या नाचवणं, नमन-खेळ्यांसारख्या लोककलाही सादर केल्या जातील. सिंधुदुर्ग जिल्ह्यात अकराशेपेक्षा जास्त ठिकाणी होळीचं पूजन होणार आहे. शिमगोत्सवानिमित्त जिल्ह्यात रोंबाट, विविध खेळे खेळले जातील. काही गावात पाच तर काही गावात सात दिवस होळीचा उत्सव चालेल.*

*गोंदिया जिल्ह्यात आज २ हजार ९००हून अधिक ठिकाणी होळी साजरी केली जाणार आहे. इथल्या भगवान खाटू श्याम बाबांच्या भक्तांनी होळीपूर्वीच धुळवड साजरी केली आहे. नैसर्गिक रंगांचा वापर करून धार्मिक गीतांवर जल्लोष करत ही होळी साजरी केली जात आहे.*

*होळीचा सण साजरा करताना पर्यावरणाची हानी टाळण्याच आवाहन राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केलं आहे.*

**- *- होल्ड... बाईट - पंकजा मुंडे - - -***

*राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी होळी आणि धुलिवंदनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. होलिकापूजन तसेच प्रेम, स्नेह आणि बंधुभावाचे प्रतीक असलेला रंगोत्सव सर्वांच्या जीवनात आनंदाचे रंग भरो आणि परस्परांमधली द्वेषभावना नष्ट होवो, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या आहेत.)*

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यांच वैशिष्ट्य असणाऱ्या होळीच्या सणाविषयी आता ऐकुया आमच्या वार्ताहराकडून…

**होल्ड… व्हीसी**

*(गेल्या पाच दिवसांपासून सातपुड्यातल्या विविध भागात होळी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो आहे. असलीची ही मानाची होळी असल्याने ती सकाळीच प्रज्वलीत करण्यात आली आहे. या होळी साठी परिसरातील आदिवासी बांधव आणि अधिकारी पाहुणे म्हणून उपस्थित होते. धडगावचा भोंगऱ्या उत्सव आज उत्साहात संपन्न झाला.*

*नंदुरबार इथे आदिवासी काठी संस्थानाची राजवाडी होळी आज साजरी होत आहे.. बाराव्या शतकापासून सुरू झालेली ही पारंपारिक होळी आदिवासी समाजासाठी ही अत्यंत मानाची असते. या होळीला अनुभवण्यासाठी देशविदेशातून पर्यटक हजेरी लावतात. होळी पौर्णिमेनंतर येणाऱ्या पहाटेला ही होळी पेटवण्यात येईल. आकाशवाणी बातम्यांसाठी नंदूरबारहून निलेश पवार)*

**<><><><><>**

माजी खासदार, माजी कुलगुरू, साहित्यिक आणि थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांचं आज सकाळी लातूरमध्ये निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वी पॅरालिसिसचा झटका आल्यामुळं त्यांच्यावर घरगुती उपचार सुरू होते.

वाघमारे यांच्या पार्थिवावर उद्या सकाळी ११ वाजता औसा तालुक्यातल्या कवठा या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी वाघमारे यांना आदरांजली अर्पण केली आहे. विद्वत्ता, तत्वनिष्ठा आणि लोकाभिमुखता यांचा त्रिवेणी संगम असलेल्या डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या

निधनामुळं शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा दुवा निखळला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

नागपूर इथल्या स्फोटक निर्मिती कारखान्यातल्या स्फोटात मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या १९ इतकी झाली आहे. खाणकाम आणि औद्योगिक वापरासाठी स्फोटकं तयार करणाऱ्या कारखान्यात काल हा स्फोट झाला. पोलिसांनी या कंपनीच्या २१ संचालक आणि भागधारकांविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला असून ९ संचालकांना अटक केली आहे.

या दुर्घटनेचा आढावा घेण्यासाठी नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. प्रत्येक मृताच्या कुटुंबाला ७५ लाख रुपये आणि जखमींना २५ लाख रुपये भरपाई देण्याचे निर्देशही बावनकुळे यांनी कंपनीला दिले आहेत.

<><><><><>

पश्चिम आशियातलं युद्ध सुरू झाल्याचा मोठा परिणाम आज जगभरातल्या शेअर बाजारात दिसून आला. व्यवहार सुरू झाले तेव्हा काही वेळ मोठ्या प्रमाणात घसरलेले देशातले शेअर बाजार सुधारले. दिवसअखेर मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार ४८ अंकांनी घसरुन ८० हजार २३९ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी ३१३ अंकांची घट नोंदवून २४ हजार ८६६ अंकांवर थांबला.

सोन्याचांदीचे दर आज मोठ्या प्रमाणात वधारले. मुंबईच्या सराफा बाजारात १ तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ७२ हजार रुपये, तर १ तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ७१ हजार ८०० रुपये मोजावे लागत होते. १ किलो चांदी २ लाख ९८ हजार रुपयांना मिळत होती.

<><><><><>

गेल्या २४ तासात विदर्भात बऱ्याच ठिकाणी तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><>//